विभागीय परीक्षा नियमांमध्ये सुधारणा-
वयाधिक्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांना
परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याविषयी.

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
**परिपत्रक क्र.परीक्षा-२००८/४३८/प्र.क्र.२६/२००८/१७,**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ४ डिसेंबर, २००८.

**वाचा :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.ईएक्सडी-१०७६/१९४५/१३७/१७, दि.१.११.१९७७.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.ईएक्सडी-१०७६/२४६३/१७, दि.१९.४.१९७९.
३) परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.ईएक्सडी-१०७६/३४/१७, दि.१७.०५.१९८०.

**परिपत्रक**

शासकीय कर्मचाऱ्यांना वयाची ४५ वर्षे पूर्ण केल्यानंतर विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून उपरोक्त संदर्भाधिन दि.१.११.१९७७ च्या शासन निर्णयानुसार सूट देण्यात आली असून, त्यानुसार आवश्यक ती सुधारणा सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या परीक्षा नियमांमध्ये करावी असे निदेश देण्यात आले आहेत. परंतु अद्यापही काही विभागांनी त्यांच्या परीक्षा नियमांमध्ये त्यानुसार आवश्यक ती सुधारणा केली नाही. या विसंगतीमुळे या विभागाच्या उपरोक्त दि.१.११.१९७७ च्या शासन निर्णयाचा आधार घेऊन काही कर्मचाऱ्यांकडून विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याची मागणी केली जाते.

२. काही विभागांमध्ये तांत्रिक स्वरुपाचे कामकाज हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्या पदाचे कौशल्य व जबाबदाऱ्या विचारात घेता विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देता येणे शक्य नसते. त्यामुळे पदोन्नती देण्यापूर्वी कर्मचाऱ्याने विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक असते. तथापि, तशी दुरुस्ती संबंधीत विभागाच्या परीक्षा नियमात केली जात नाही. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांकडून परीक्षेतून सूट मिळण्याकरीता न्यायालयात /न्यायाधिकरणात दावे दाखल केले जातात.

३. विभागीय परीक्षेतून सूट मिळण्यासंदर्भात अनेकजण न्यायालयात दावे दाखल करीत असल्यामुळे या विषयाच्या अनुषंगाने सर्व विभागांना सर्वसमावेशक स्पष्ट सूचना सामान्य

प्रशासन विभागाने द्याव्यात असे निदेश मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने एका न्यायालयीन प्रकरणात या विभागास दिले आहेत. त्यामुळे मा. न्यायाधिकरणाच्या निदेशास अनुसरुन सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

१. प्रशासकीय विभागांनी त्यांच्याकडील तांत्रिक संवर्गातील अधिकारी /कर्मचाऱ्यांना वयाची ४५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देता येणार नाही असा जाणीवपूर्वक निर्णय घेतला असेल तर त्यासंबंधीची योग्य ती तरतूद संबंधित पदांच्या विभागीय परीक्षा नियमांमध्ये तातडीने करण्याची कार्यवाही करावी.

२. विभागामध्ये काही पदांवर वयाच्या ४५ वर्षानंतरदेखिल नामनिर्देशनाव्दारे नियुक्त्या केल्या जातात. अशा प्रकारे नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट न देण्याचा जाणीवपूर्वक निर्णय विभागाने घेतला असल्यास त्यासंदर्भातही योग्य ती तरतूद परीक्षा नियमात संबंधित विभागांनी करावी.

३. ज्या पदांना ४५ वर्षानंतर विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट अनुज्ञेय असेल त्या पदांचे बाबतीत संबंधित विभागांनी तशी स्पष्ट तरतूद त्या पदाच्या विभागीय परीक्षा नियमात अंतर्भूत करण्याची कार्यवाही तात्काळ करावी. जरी अशी तरतूद शासन निर्णयान्वये यापूर्वी लागू केली असली तरीदेखिल ती परीक्षा नियमात अंतर्भूत करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( वि.द.आठवले )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव,
३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
५. महालेखापाल-१ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
६. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
७. महालेखापाल-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, वांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रा (पूर्व), मुंबई,
९. वित्त विभाग (सेवा-२), मंत्रालय, मुंबई,
१०. सामान्य प्रशासन विभाग, का.क्र.८,१२,१४,१९, मंत्रालय, मुंबई,
११. सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना),
१२. निवड नस्ती.